महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण),
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.
Web : www.dhepune .gov. in E-Mail :mavi. dhepune@gov.in
फोन नं.020/26122119,26051512,26130627,26124639 फॅक्स नं. 020/26111153.

क्र.: उशिसं/मवि-१/स्वा.अ.म./२०२३/ 8696 दिनांक: .०२०२३

04 AUG 2023

# परिपत्रक

**विषय: स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्त 'मेरी माटी, मेरा देश' हा उपक्रम साजरा करण्याबाबत...**

वाचा- १. शासनपत्र क्र.: संकीर्ण-२०२३/प्र.क्र.१०९/विशि-५ दि. २८.७.२०२३
२. सांस्कृतिक विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र.: संकीर्ण८२२३/ प्र.क्र. ५१०/ सां.का.-४ दि. २७.७.२०२३

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त 'मेरी माटी, मेरा देश' हा उपक्रम साजरा करण्याबाबत संदर्भांकित पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव हा उपक्रम संपन्न होत असल्याच्या पार्श्वभूमीवर, केंद्र सरकारने 'मेरी माटी, मेरा देश' या नवीन उपक्रमाची घोषणा केली आहे. या उपक्रमांतर्गत पुढील कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे.

१. अमृत सरोवर/जल स्त्रोतांशेजारी शिलाफलकम् उभारणी.
२. पंच प्रण शपथ व सेल्फी.
३. वसुधा वंदन.
४. वीरोंका नमन.
५. ध्वजारोहण व राष्ट्रगाण.

प्रत्येक राज्यामध्ये आपल्या मातीविषयी जनजागृती, प्रेम आणि साक्षरता निर्माण व्हावी, वीर योध्दांच्या समर्पणाचे स्मरण करणे याकरीता विशेष अभियान राबविणे आवश्यक आहे. या अभियानात ग्रामपंचायत स्तरापासून ते महानगरपालिकेपर्यंत, सर्व स्थानिक स्वराज्य संस्था तसेच राज्य शासनाच्या वेगवेगळया विभागांनी योगदान देणे आवश्यक आहे. उच्च शिक्षण विभागासाठी निश्चित करण्यात आलेल्या जबाबदारीच्या अनुषंगाने सर्व महाविद्यालयात या अभियानाबाबत जनजागृती करुन पुढील कार्यक्रम घेण्यात यावेत.

१. महाविद्यालयातील विद्यार्थी व व्याख्यात्यांनी पंच प्रण शपथ घ्यावी व शपथ घेतानाची सेल्फी https://yuva.gov.in/meri_maati_mere_desh या वेबसाईटवर अपलोड करण्यास विद्यार्थ्यांना प्रोत्साहीत करावे.
२. जिल्हा प्रशासन तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत या निमित्ताने आयोजित करण्यात येणा-या उपक्रमांत सक्रीय सहभाग नोंदविण्याकरीता युवा शक्तीस प्रेरीत करण्यात यावे.
३. पालकांना या उपक्रमाबाबत विविध माध्यमांद्वारे अवगत करावे.

उच्च शिक्षण विभागास दिलेल्या उपरोक्त जबाबदारीबाबत वरिष्ठ महाविद्यालयांनी योग्य नियोजन करुन कार्यवाही करण्यात यावी.

विषयांकित प्रकरणी महाविद्यालयांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संबंधित विभागीय सहसंचालक कार्यालयांस सादर करावा. विभागीय सहसंचालक कार्यालयांनी त्यांच्या कार्यकक्षेतील सर्व महाविद्यालयांचा अहवाल आपल्या स्तरावर संकलीत करुन एकत्रित स्वरुपात संचालनालयास सादर करावा.

(डॉ. प्रकाश बच्छाव)
शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे -१.

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
२. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे/अभिमत विद्यापीठे/स्वयंअर्थसहायित विद्यापीठे - महाराष्ट्र राज्य.
३. प्राचार्य/संचालक, सर्व शासकीय/ अशासकीय, अनुदानित/ विना अनुदानित/कायम विना अनुदानित/ मॉडेल डिग्री महाविद्यालये महाराष्ट्र राज्य.

प्रत माहितीस्तव - मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०००३२.